सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २४ जून २०१६.

**महानगरपालिका व जिल्हा परिषदांतील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर**

मुंबई, दि. २४: राज्यातील विविध महानगरपालिकांतील ८, जिल्हापरिषदा व पंचायत समित्यांमधील प्रत्येकी ३ रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १ जुलै २०१६ रोजी अस्तित्वात येणारी विधानसभा मतदार संघाची मतदार यादी या पोटनिवडणुकांसाठी यादी ग्राह्य धरली जाणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी १६ जुलै २०१६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर २३ जुलै २०१६ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी ३० जुलै २०१६ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी देखील १६ जुलै २०१६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर २२ जुलै २०१६ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येईल. अंतिम मतदार याद्या ३० जुलै २०१६ रोजी प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहितीही श्री. सहारिया यांनी दिली.

**जिल्हानिहाय जिल्हा परिषदांच्या निवडणूक विभागांच्या रिक्त पदांचा तपशील असा: सातारा-** नागठाणे (ता. सातारा ), **अकोला-** हातगांव (ता. मूर्तिजापूर) व **गडचिरोली-** कढोली सावलखेडा (ता. कुरखेडा).

**पंचायत समितीनिहाय निर्वाचक गणांच्या रिक्त पदांचा तपशील असा: हवेली (जि. पुणे)-** खेड, **कडेगांव (जि. सांगली)-** कडेपूर व **लातूर (जि. लातूर)-** गातेगांव.

**महानगरपालिकानिहाय रिक्त पदांचा तपशील असा: औरंगाबाद-** १२, **नाशिक-** ३६ब व ३५ब, **ठाणे-**५३अ व ३२अ, **लातूर-** २अ, **परभणी-** १६ब; तसेच **अमरावती-** ३२ब.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)